MCAER
कृषि परिषद
महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,
१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.
ई मेल- mcaer@rediffmail.com दूरध्वनी क्र.- ०२०-२५५२८६८८
संकेतस्थळ- www.mcaer.org

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/७८२३/30 दि.03 जानेवारी,२०२४

## परिपत्रक

विषयः- आचार्य पदवी प्रवेश प्रक्रिया २०२३-२४
भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या कोटयातील प्रवेश प्रक्रियेंतर्गत रिक्त जागा भरणेबाबत.

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत आचार्य पदवी अभ्यासक्रमाची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया दि. २०/१२/२०२३ पासून सुरु झालेली आहे. भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या (भाकृअप) कोटयातील राखीव जागा वगळून उर्वरित जागांचे वाटप (seat matrix) निश्चित करण्यात आले होते. तथापि, भाकृअपकडील आचार्य पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेली असून भाकृअप कोटयातील प्रवेश क्षमतेंतर्गत खालील ७ जागा रिक्त आहेत.

| कृषी विद्यापीठाचे नाव | विषय | प्रवेश क्षमतेंतर्गत रिक्त जागांची संख्या |
|---|---|---|
| वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी | कृषी- बीजशास्त्र आणि तंत्रज्ञान | १ |
| | कृषी- वनस्पती रोगशास्त्र | १ |
| | कृषी अभियांत्रिकी- मृद् व जलसंधारण अभियांत्रिकी | १ |
| डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली | कृषी- मृदशास्त्र | १ |
| | कृषी- वनस्पती शरीरशास्त्र | १ |
| | मत्स्यविज्ञान- मत्स्यशेती | १ |
| | कृषी अभियांत्रिकी- सिंचन व निचरा अभियांत्रिकी | १ |
| **एकूण** | | ७ |

आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेस अनुसरून कृषी परिषदेकडून प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. त्यामुळे संबंधित विषयाची आचार्य पदवी प्रवेश माहिती पुस्तिकेमध्ये नमूद केलेली प्रवेश क्षमता विचारात घेऊन प्रवेश क्षमतेंतर्गत असलेल्या भाकृअपकडील वरील ७ रिक्त जागांचा प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश करण्यात येत आहे. यानुसार वरील विषयांचे सुधारीत जागा वाटप (seat matrix) संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

admn23-24

सर्व संबंधित उमेदवारांना कळविण्यात येते की, सुधारीत जागा वाटपामुळे महाविद्यालयांचे पसंतीक्रमामध्ये बदल करावयाचे असल्यास त्यांनी दि. ०७/०१/२०२४ ते दि. १०/०१/२०२४ या कालावधीत महाविद्यालयांचे पसंतीक्रम सुधारीत करावेत. याबाबतची सुविधा उमेदवारांच्या लॉगइनद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

**मा. महासंचालक**
**यांच्या मान्यतेने.**

(हेमंत पाटील)
संचालक (शिक्षण)

प्रत कार्यवाहीसाठीः-

१) मे. विबास टेक्नोलॉजी, पुणे

यांना सूचित करण्यात येते की, सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

२) मे.लर्निंग स्पायरल प्रा.लि. ३ अे, ऑकलँड प्लेस, पाचवा मजला, कलकत्ता ७०००१७ (पश्चिम बंगाल)

यांना सूचित करण्यात येते की, उक्त परिपत्रकामध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे उमेदवारांच्या लॉगइनमध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, तसेच सदर परिपत्रक प्रवेश प्रक्रियाविषयक संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावे आणि सर्व संबंधित उमेदवारांना भ्रमणध्वनी / ई-मेलद्वारे अवगत करण्यात यावे.

प्रत माहितीसाठीः-

कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी